I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S. (पोलीस ठाणे):** कराड शहर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0122 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/02/2025 07:34 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** बुधवार **Date from (दिनांक पासून):** 05/02/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 05/02/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 17:11 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:35 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 06/02/2025 **Time (वेळ):** 05:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 017 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 06/02/2025 07:33 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 3 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** क्वलीटी लिकर सरकारमान्य देशी , दारु दूकान मलकापूर नाका,, कराड, ता कराड,कराड

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री. मुराद मुसा सय्यद

**(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1986 **(d) Nationality (राष्‍ट्रीयत्‍व):**भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सैदापुर नवीन ग्रापं शेजारी,, कराड, कराड शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | सैदापुर नवीन ग्रापं शेजारी,, कराड, कराड शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9175339466

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | भिमराव शंकर माळी | | | 1. Town/Village (शहर / गाव): विंग,ता कराड,Tehsil (तहसील): कराड,Police Station (पोलीस ठाणे): कराड शहर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | मुस्तफा मोहिदिन मणियार | | | 1. Town/Village (शहर / गाव): मलकापूर,लक्ष्मीनगर,ता कराड,Tehsil (तहसील): कराड,Police Station (पोलीस ठाणे): कराड शहर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम3,000/ रू. (तीन हजार रुपये) | 3,000.00 |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 3,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

जबाब दि. 06.02.2025

मी मुराद मुसा सय्यद, वय 39 वर्षे, व्यवसाय- लग्नामधील घोडे नाचविणे, रा. मु.पो.सैदापूर नविन ग्रामपंचायत शेजारी ता.कराड जि.सातारा. मो.क्र. 9175339466

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. माझा लग्नामधील घोडे नाचविणेचा व्यवसाय असून त्यावर माझा उदरनिर्वाह चालतो. माझा देशी दारू विक्री करणेचा व्यवसाय होता परंतू मागील 3 महिन्यापासून सदरचा व्यवसाय मी बंद केला आहे.

नोव्हेंबर 2024 मध्ये भिमराव माळी पोलीस, राज्य उत्पादन शुक्ल विभाग कराड हे माझ्या घरी येवून त्यांनी मला मी अवैद्य देशी दारू विक्री करीत असल्याचे सांगून त्यांनी त्यांचेकडील एक फॉर्म भरून घेवून माझा आधारकार्ड नंबर घेतला होता. त्यावेळी माळी पोलीस यांनी माझे आधारकार्ड त्यांचे व्हॉट्सअप नंबर वर पाठविण्यास सांगितले होते त्याप्रमाणे मी माझे आधारकार्ड त्याचे व्हॉट्सअप नंबर 9800223002 वर पाठविले होते. त्यावेळी माळी पोलीस यांनी माझेविरूध्द अवैद्य दारू विक्रीची केस करणार असल्याचे सांगितले होते. त्यावेळी मी माळी पोलीस यांना मी दारू विक्रीचा व्यवसाय बंद केला असल्याचे सांगितले होते.

त्यानंतर दि. 21.01.2025 रोजी माळी पोलीस हे माझ्या राहते घरी येवून मी अवैद्य देशी दारू विक्री करीत असल्याचे सांगून नोव्हेंबर 2024 मध्ये माझेविरूध्द दाखल दारू विक्रीचे केस मध्ये मदत करण्यासाठी तसेच दारू विक्रीचा धंदा पुन्हा चालू ठेवण्यासाठी मागील 6 महिन्यांचे प्रत्येक महिन्यांचे 1,500/- रूपये प्रमाणे एकुण 9,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी भिमराव माळी पोलीस यांना मी दारू विक्रीचा व्यवसाय बंद केला असल्याचे सांगितले. त्यावेळी माळी पोलीस यांनी मला, माझ्याविरूध्द अवैद्य दारू विक्रीची केस केली असून माझेविरूध्द कारवाई करून मला कोर्टात भेटवून माझ्याविरूध्द कारवाई करणार असल्याची भिती घातली होती. तसेच दि.01.02.2025 रोजी मुस्तफा मणियार याने त्याचे फोन क्र. 7666808075 वरून मला कॉल करून माळी पोलीस यांनी मला भेटण्यास बोलविले असल्याचा निरोप दिला असल्याचे सांगितले होते.

भिमराव माळी पोलीस यांना मी प्रत्येक महिन्याचे 1,500/- रूपये प्रमाणे 6 महिन्याचे 9,000/- रूपये दिले नाहीतर ते माझ्याविरूध्द अवैद्य दारू विक्री करण्याचा खोटा गुन्हा दाखल करून माझेविरूध्द कारवाई करतील अशी मला भिती असून मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. 04.02.2025 रोजी मी पुणे अँन्टी करप्शन ब्युरो, येथील सरदेशपांडे साहेबांना भेटून माझी माळी, पोलीस राज्य उत्पादन शुल्क विभाग कराड यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळविली होती. त्यावेळी तेथील साहेबांनी मला सांगली अँन्टी करप्शन येथील पाटील साहेब हे आपणास संपर्क करून माझे तक्रारीची पुढील कारवाई करतील असे सांगितले होते. त्यानंतर रात्री 08.10 वा चे सुमारास सांगली अँन्टी करप्शन येथील पाटील साहेब यांनी मला संपर्क केला असता मी त्यांना माझी माळी, पोलीस पोलीस राज्य उत्पादन शुल्क विभाग कराड यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळविली होती. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला दि. 05.02.2025 रोजी सकाळी 10.00 वा. त्यांचेकडील एक

पथक कराड येथे येत असल्याचे सांगून आलेनंतर मला संपर्क करीत असल्याचे सांगितले.

त्यानंतर दि.05.02.2025 रोजी सकाळी 11.32 वा चे सुमारास सांगली अँन्टी करप्शन येथील, पोलीस निरीक्षक श्री. खाडे साहेब यांनी मला संपर्क करून ते पथकासह कराड येथील कार्वे नाका येथे येत असल्याचे सांगून मला सदर ठिकाणी हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी 12.15 वा चे सुमारास माझेकडील हिरोहोंडा फॅशन क्र.एमएच 10 एएल 0548 वरून कार्वे नाका कराड येथे जावून खाडे साहेबांची भेट घेतली.

त्यावेळी खाडे साहेब यांनी मला त्यांची व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती देवून मला माझा तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा हस्तलिखीत तक्रारी अर्ज खाडे साहेब यांचे समक्ष हजर केला. मी दिले तक्रारी अर्जावर खाडे साहेब यांनी वाचून सही केली. त्यानंतर खाडे साहेब यांनी त्यांचेसोबत असले शासकीय पंचांची ओळख करून दिली.

सदर कारवाईसाठी पंच नं. 1 म्हणून पवन आमझरी, व्यवसाय – लिपीक, सहा.कामगार आयुक्त कार्यालय सांगली यांनी व पंच नं.2 म्हणून खंडू चव्हाण, व्यवसाय – लिपीक, सहा.कामगार आयुक्त कार्यालय सांगली यांनी काम करण्याचे निश्चित केले. त्यानंतर खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचा समक्ष थोडक्यात कथन केली व माझा तक्रारी अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पंचांनी तक्रारी अर्ज वाचून सांगितलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकूर एकच असल्याचे खात्री झालेनंतर तक्रारी अर्जावर सहया केल्या.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला माळी पोलीस, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय कराड यांचे काम करण्याचे ठिकाण विचारले असता मी त्यांना माळी पोलीस यांचे काम करण्याचे ठिकाण हे राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालय कराड, बैलबाजार रोड येथे असल्याचे सांगितले. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंच नं.1 पवन आमझरी यांना राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालय कराड, येथे माळी पोलीस यांचेकडे पाठवून लाच मागणीची पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती देवून पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.22 वा सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे शर्टच्या आतमध्ये सोडला. त्यानंतर मी, पंच नं.1 पवन आमझरी असे माझेकडील हिरोहोंडा फॅशन क्र.एमएच 10 एएल 0548 वरून रवाना होवून राज्य उत्पादन शुल्क कार्यालय कराड येथे दाखल झालो. त्यानंतर मी व पंच नं.1 पवन आमझरी असे राज्य उत्पादन शुल्क कार्यालय कराड कार्यालयामध्ये जावून माळी, साहेब यांची भेट घेवून त्यांना "मुस्तफान सांगितलेल भेटायला तुम्हाला" असे म्हणालो. त्यावर माळी साहेब यांनी मला मुस्तफा यास फोन करून बोलावून घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझे मोबाईल वरून मुस्तफा याचे मोबाईल क्र.7666808075 वर फोन करून त्यास बोलावून घेतले. त्यानंतर माळी साहेब यांनी मला बाहेर थांबण्यास सांगितले असता मी त्यांचे कार्यालयाचे मेन दरवाज्याचे बाहेर जावून थांबून राहिलो. काही वेळाने मुस्तफा मणियार हा तेथे आला व लगेच माळी साहेब बाहेर येवून माझेशी चर्चा करू लागले. त्यावेळी मी, माळी साहेब व मुस्तफा असे तिघे चर्चा करू लागलो. त्यावेळी आमचेमध्ये केसबाबत चर्चा झाली. त्यावेळी माळी साहेब यांनी पैशाचा विषय काढला असता मी "दीड हजार रूपये जास्त होत असलेचे सांगितले. त्यावेळी माळी साहेब यांनी मला "एक हजारच द्या, पण मी

जवा पासन आलोय तवा पासन द्यायला लागतील, हितन माग दिल न्हाय म्हणून मी सवलत देणार न्हाय, कारण मला विचारणारी दोघ हायत इथ पुढ, न्हाय तर मी पैसे मी खाल्ल अस अर्थ होतय त्याचा" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "किती" असे विचारले असता माळी साहेब यांनी मला "हजारनच द्या पैसे, मी आल्यापासन सहा महिन्याच" असे म्हणून माळी साहेब यांनी माझ्याकडे प्रत्येक महिन्याचे 1,000/- रूपये प्रमाणे सहा महिन्याचे एकुण 6,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावर मुस्तफा याने मला "सहा महिने ना, सहा महिन्याच किती द्यायच" असे विचारले. त्यावर माळी साहेब यांनी मला "हजार रूपयान सहा हजार रूपये त्यांच्याकड पोच करा, न्हाय तर हयाच्याकड द्या" असे मुस्तफा यास उद्देशून पैसे मुस्तफा याचेकडे देण्यास सांगितले.

त्यानंतर मी माळी साहेब यांना माझा धंदा बंद असून माझेविरूध्द केस दाखल न करण्याची विनंती केली असता माळी साहेब यांनी माझ्याविरूध्द केस दाखविली नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी माळी साहेब यांना रक्कम कमी करण्याची विनंती केली असता माळी साहेब यांनी "हजार रूपये देवू नका, पाच हजार द्या, देवून टाका, विषय इथन पुढ महिन्याच्या महिन्याला द्या, हयाच्यापेक्षा मी वेगळ बोलू शकत नाही" असे म्हणून माळी साहेब यांनी तडजोडी अंती माझेकडे 5,000/- रूपये लाचेची मागणी करून दर महिन्यास 1,000/- रूपये हप्ता देण्यास सांगितले. त्यावर मुस्तफा याने मला "पैसे दे की, फिरकणार पण नाही" असे म्हणाला. त्यावर मी माळी साहेब यांना "व्हय माळी साहेब, आत्ता तीन देतो तुम्हाला" असे म्हणालो असता माळी साहेब यांनी "असच तुम्ही म्हणलाता घरापाशी....बर का मुस्तफा ह माणुस शब्द पलटतोय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "तासाभरात आणुन देतो तुमच्यापाशी" असे म्हणालो. त्यावर माळी साहेब यांनी "नको नको, त्याच्याकडच द्या, पाच द्या, मी नाही घेणार पैसे" असे म्हणून पैसे मुस्तफा याचेकडे देण्यास सांगितले.

त्यानंतर माळी साहेब यांनी मुस्तफा यास "ते घे तुमच्याकडच करून, पोच कर नंतर आज काय होतय ते आज घे, दोन दिवसात राहिलेल घे" असे म्हणाले. त्यावर मुस्तफा याने मला "आत्ता कत्ते देणे वाले है बोलो, बाकी कबी देणे वाले है बोलो, मै देता हु उनको" असे म्हणाला. त्यावर मी त्यास "आत्ता क्लिअर करतो की तुम्हाला देतो मी तुम्हाला.....तीन एक हजार रूपये देतो मी तुम्हाला.... बाकीच मग एक दोन दिवसांनी" असे म्हणालो. त्यावर माळी साहेब यांनी मला, मुस्तफा यास उद्देशुन "त्याच्याकडच द्या" असे म्हणून "आत्ता आणल्यात का तिन" असे विचारले असता मी त्यांना "न्हाय एटीएम मधून घेवून देतो की" असे म्हणालो. त्यावर माळी साहेब यांनी "हा त्याचाकड द्या की....संध्याकाळी आल्यावर" असे म्हणून मुस्तफा यास "तुझ्याकडच घे ते सगळच" असे म्हणाले. त्यानंतर मी माळी साहेब यांना माझ्याविरूध्द केस दाखल न करण्याची विनंती केली. त्यावर माळी साहेब यांनी "न्हाय करत जावा, करा धंदा चालू" असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच नं.1 पवन आमझरी असे राज्य उत्पादन शुल्क कार्यालय कराड येथून माझेकडील मो.सा. वरून रवाना होवून खाडे साहेब व सापळा पथक थांबले ठिकाणी आलो. त्यावेळी खाडे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला. त्यानंतर खाडे साहेबांनी मला व पंच नं.1 आमझरी यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुण झालेल्या संभाषणाची पंचांसमक्ष खात्री केली.

मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने खाडे साहेबांनी माळी साहेब यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये, भिमराव माळी, पोलीस राज्य उत्पादन शुल्क कार्यालय कराड यांनी

माझेविरूध्द दाखल दारू विक्रीच्या केसमध्ये मदत करण्यासाठी व दारू विक्रीचा धंदा पुन्हा चालू ठेवण्यासाठी पंचासमक्ष स्वत: करीता प्रत्येक महिन्याचे 1,000/- रूपये प्रमाणे 6 महिन्याचे एकुण 6,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 5,000/- रूपये स्विकारण्याचे कबूल करून पहिला हप्ता 3,000/- रूपये मुस्तफा मणियार याचेकडे देण्यास सांगितले. तसेच मुस्तफा मणियार याने माझेत व भिमराव माळी, साहेब यांचेतील लाच मागणीचे चर्चेमध्ये सहभाग घेवून मी लाच रक्कम माळी साहेब यांना देण्यास मला प्रोत्साहन दिले असल्याचे तसेच सदर लाचेची रक्कम माळी साहेब यांचे सांगणेप्रमाणे तो स्वत: स्विकारणार असलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर खाडे साहेबांनी सापळा कारवाईचे ठिकाण निश्चित करण्यासाठी मुस्तफा मणियार यांना फोन करण्याचे निश्चित केले. त्यानंतर खाडे साहेबांनी मला मुस्तफा याचे मोबाईलवर फोन करून त्यास फोन स्पिकर मोडवर घेणेच्या व भेटीचे ठिकाण निश्चित करणेच्या सुचना दिल्या. खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 9175339466 वरून मुस्तफा याचे मोबाईल क्र.7666808075 वर फोन करून त्यास माळी साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे पैसे देणेबाबत चर्चा केली. त्यावेळी मुस्तफा यांनी मला माळी साहेब यांचेकडे ऑफीसला जावून त्यांनाच भेटण्यास सांगितले. व त्यानंतर संध्याकाळी पैसे त्यांचेकडे देण्यास सांगितले. त्यानंतर आमचेतील चर्चा झालेनंतर मी कॉल कट केला.

त्यानंतर मी पुन्हा खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 9175339466 वरून मुस्तफा याचे मोबाईल क्र.7666808075 वर फोन करून माळी साहेब यांनी सदरचे पैसे हे मु

हे मुस्तफा यांचेकडेच देणेस सांगितलेने मी त्यास "भैय्या तुम्हारा कनच पैसे देतो तो मै......फिर माळी साब को तुम्हारा तुमी देव" असे म्हणालो. त्यावर मुस्तफा याने "क्या बोले उन्हे, गए नई क्या तुमे" असे म्हणाला असता मी त्यास "सुब को बोले न तुमारे पासच देणे" असे म्हणालो. त्यानंतर मी मुस्तफा यास मी बाहेर जाणार असल्याचे सांगून रक्कम त्यास घेणेबाबत विचारणा केली असता मुस्तफा याने मला त्याचे दुकान येथे येण्यास सांगून फोन कट केला. सदरचे दोन्ही कॉल्स खाडे साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले आहेत.

झाले एकंदरीत सापळा पुर्व कारवाई वेळी, मुस्तफा याने मला त्याचे क्लॉलिटी लिकर देशी दारू दुकान मलकापूर नाका कराड येथे लाच रक्कम घेवून येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मुस्तफा याचेविरूध्द क्लॉलिटी लिकर देशी दारू दुकान येथे लागलीच सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करून मला लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्याप्रमाणे मी माझेकडील 500/- रूपये दराच्या 6 नोटा असे एकुण 3,000/- रूपये खाडे साहेब यांचेसमक्ष हजर केले. त्यानंतर खाडे साहेब यांनी 3,000/- रूपये लाच रक्कमेचे नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच, श्री. खाडे साहेब व मी सही केली. त्यानंतर श्री. खाडे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशयामध्ये ठेवल्या. त्यानंतर खाडे साहेबांनी सापळापुर्व

कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर खाडे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 17.11 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे शर्टच्या आतमध्ये सोडून मला व पंच नं.1 आमझरी यांना रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी, पंच नं.1 आमझरी असे माझेकडील मो.सा. वरून रवाना झालो. आमचे पाठोपाठ खाडे साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनांने रवाना झाले. मी माझेकडील मो.सा. ने कार्वे नाक्यावरून बैलबाजार रोडने मलकापूर जाणारे रोडने जावून क्लॉलीटी लिकर देशी दारू दुकान येथे दाखल झालो. खाडे साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने आमचे पाठोपाठ दाखल झाले.
त्यानंतर मी व पंच नं.1 असे क्लॉलीटी लिकर देशी दारू दुकान येथे जावून मी मुस्तफा यास हाताने इशारा करून त्यास दुकानाचे बाहेर बोलावून घेतले. त्यानंतर मुस्तफा हा दुकानातून बाहेर आलेनंतर मी त्यास “भैय्या माळी साहेब को लगाव की फोन” असे म्हणालो असता मुस्तफा याने माळी साहेबांचा नंबर नसल्याचे सांगून माझेकडे हाताने इशारा करून पैशाची मागणी केली. त्यावेळी मी माझे उजवे बाजुचे खिश्यातील अँथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढून मुस्तफा याचेसमोर धरून “यह लो उनका, क्लीअर करो तो अपना टेन्शन गायब” असे म्हणालो. त्यावर मुस्तफा याने लाच रक्कम त्याचे उजवे हाताने स्विकारून त्याचे शर्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये लाच रक्कम ठेवून “तुम्हे लय टेन्शन लेने का नही उसका” असे म्हणाला. त्यावर मी त्यास “माळीसाहब को बोलो, पोहचल्यात आपले करके” असे म्हणालो. त्यावर मुस्तफा याने “तीन हजार दिए बोलतो..... दो हजार बाकी...फोन नही लग रहा है...मै बोलतो उनको..” असे म्हणाला. त्यावर मी त्यास “माळी साब को बोलो...फक्त आपला केस का क्या आता क्या करते, बोलना” असे म्हणालो. त्यावर मुस्तफा याने “पैसे देओ उन्हे, नही क्या करता है वो....तीन हजार रूपये है ना ? असे विचारले असता मी त्यास “हा” असे म्हणाले. त्यानंतर मी बाजूस येवून माझेकडील हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारले बाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. लागलीच सापळा पथक माझेजवळ आले व खाडे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला जावून थांबण्यास सांगितले. सापळा पथकाने मुस्तफा यांना ताब्यात घेतले. तसेच मुस्तफा याचे खिश्यातील 3,000/- रुपये लाच रक्कम खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 यांनी ताबेत घेतली.
सदर ठिकाणी खाडे साहेब यांनी मुस्तफा मणियार यांना त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.मुस्तफा मोहिदिन मणियार वय- 25 वर्षे व्यवसाय - देशी दारु दुकान मॅनेजर रा. मलकापुर, लक्ष्मीनगर ता. कराड जि. सातारा असल्याचे सांगितले. त्यानंतर खाडे साहेब यांनी भिमराव माळी साहेब यांना ताबेत घेणेसाठी राज्य उत्पादन शुल्क कार्यालय कराड येथे जाणेचे निश्चित करून मला त्यांचे पाठोपाठ येण्यास सांगितले. त्यानंतर खाडे साहेब व सापळा पथक असे मुस्तफा मणियार यास ताबेत घेवून मलकापूर येथून रवाना होवून राज्य उत्पादन शुल्क कार्यालय कराड येथे दाखल झाले. मी देखील त्यांचे पाठोपाठ दाखल झालो. खाडे साहेब यांनी राज्य उत्पादन शुल्क कार्यालय कराड येथे भिमराव माळी यांचा शोध घेतला असता ते सदर ठिकाणी मिळून आले नाहीत. त्यानंतर खाडे साहेब यांनी माळी साहेब यांना ताबेत घेणेकरीता तसेच त्यांचे राहते घराचे पत्त्यावर शोध घेणेकरीता पथक रवाना केले. त्यानंतर तेथील कारवाई पुर्ण झाल्यानंतर खाडे साहेब

यांनी मला शासकीय विश्रामगृह कराड येथे जाण्यास सांगितले. त्यानंतर खाडे साहेब व सापळा पथक असे रवाना होवून शासकीय विश्रामगृह कराड येथे दाखल झालो. सदर ठिकाणी खाडे साहेब यांनी सविस्तर पडताळणी, सापळापूर्व व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही पूर्ण केली.

तरी दि. 05.02.2025 रोजीचे 13.22 वा. ते 14.04 वा. च्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक क्र.1) भिमराव शंकर माळी वय-37 वर्षे व्यवसाय - नोकरी, पद - जवान ब.नं. 27 निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग कराड (वर्ग- 3) रा. मलकापुर ता. कराड जि. सातारा यांनी आपले स्वत: चे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने माझेविरूध्द दाखल दारू विक्रीच्या केसमध्ये मदत करण्यासाठी व दारू विक्रीचा धंदा पुन्हा चालू ठेवण्यासाठी स्वत: करीता प्रत्येक महिन्याचे 1,000/- रूपये प्रमाणे मागील 6 महिन्याचे एकुण 6,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 5,000/- रूपये स्विकारण्याचे कबूल करून पहिला हप्ता 3,000/- रूपये आरोपी क्र.2) मुस्तफा मणियार यांचेकडे देण्यास सांगितले. तसेच यातील आरोपी क्र.2) मुस्तफा मणियार याने माझेत व भिमराव माळी, साहेब यांचेतील लाच मागणी चर्चेमध्ये सहभाग घेवून मी लाच रक्कम भिमराव माळी यांना देण्यास मला प्रोत्साहन दिले असल्याचे निष्पन्न झाले. तसेच आरोपी क्र.2) मुस्तफा मणियार यांनी आरापी क्र.1) भिमराव माळी यांचे सांगणेप्रमाणे माझ्याकडून 3,000/- रूपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले आहे.

त्यानंतर लागलीच दि.05.02.2025 रोजीचे 17.11 वा ते 17.35 वा चे दरम्यान क्वॉलीटी लिकर सरकारमान्य देशी दारु दूकान मलकापूर नाका, कराड, ता. कराड, जि. सातारा येथे सापळा कारवाई वेळी यातील आरोपी क्र.2) मुस्तफा मोहिदिन मणियार वय-25 वर्षे व्यवसाय- देशी दारु दुकान मॅनेजर रा. मलकापुर, लक्ष्मीनगर ता. कराड जि. सातारा (खाजगी इसम) यांनी भ्रष्ट व गैरमार्गाने आरोपी लोकसेवक क्र.1) भिमराव शंकर माळी यांचे सांगणेप्रमाणे माझेकडे 3,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम आरोपी क्र.1) यांचेकरीता स्विकारली आहे. म्हणून माझी लोकसेवक क्र.1) भिमराव शंकर माळी वय-37 वर्षे व्यवसाय- नोकरी, पद – जवान ब.नं. 27 निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग कराड (वर्ग -3) रा. मलकापुर ता. कराड जि. सातारा व आरोपी क्र.2) मुस्तफा मोहिदिन मणियार वय-25 वर्षे व्यवसाय-देशी दारु दुकान मॅनेजर रा. मलकापुर, लक्ष्मीनगर ता. कराड जि. सातारा (खाजगी इसम) यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिन्ट काढल्यानंतर मला वाचून दाखविला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर टंकलिखीत केला आहे.

समक्ष                                                                 हा दिला

वर्दीजबाब,

**13.**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** RAJU ANANDA TAHSILDAR (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RAJU ANANDA TAHSILDAR

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PNMH50695

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल् या/पाहिलेल् या) शारीरिक वैशिष् टये, व् यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन् मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच् या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1988 | | - | | **चेचक:** क्र. |
| 2 | पुरुष | 2000 | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व् यंग वैशिष् टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच् या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल् याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त यापेक्षा अधिक तपशील दिल यास फक त यातील रकान यांची नोंद घेतली जाईल)**